चार कोटींच्या विकास कामांचे माजी आ. संजय रायमुलकर यांच्या हस्ते आंध्रुड येथे लोकार्पण >>पान 2

'शिवसेना झोपेतून उठायला तयार नाही तर काँग्रेस...'; अमोल कोल्हेंची पवारांसमोरच मित्र पक्षांवर टीका >>पान 3

राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त विशेष वैद्यकीय सेवा मदत कक्ष आणि आरोग्य शिबिराचे आयोजन >>पान 4

**सुविचार**

जीवनातील खरी सुख-शांती अहंकारमुक्त जीवनात आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 150 ■ शनिवार, दि. 11 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




'सिनेमाने शास्त्रीय संगीताचं नुकसान केलं', सुबोध भावे स्पष्टच बोलला

आतील पान

## हवामान बदलाचा मोठा परिणाम होणार!

# गहू, तांदूळ महागणार; पाणीटंचाईही जाणवणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : हवामान बदलाच्या प्रादुर्भावामुळे भारतातील गहू आणि तांदळाच्या उत्पादनात ६ ते १० टक्के घट होण्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. यामुळे अन्नधान्याच्या किमती वाढतील आणि अन्नधान्याच्या उपलब्धतेवर परिणाम होईल. महत्वाचे म्हणजे, केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम. रवीचंद्रन यांनी सांगितले की, हिमालयीन भागांतील पाण्याचा स्रोत असलेल्या वेस्टर्न डिस्टर्बन्सेस कमी झाल्याने भविष्यात अब्जावधी लोकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागेल.**



हवामान खात्याचे संचालक मृत्युंजय महापात्र यांच्या मते, हवामान बदलाचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच नाही, तर देशाच्या अन्नसुरक्षेलाही बसण्याची शक्यता आहे. भारतीय लोकसंख्येच्या अर्ध्याहून अधिक लोक शेतीवर अवलंबून आहेत. तर ८० टक्के लोक सरकारी अन्नधान्य योजनेवर अवलंबून आहेत. त्यामुळे हवामान बदलाचा शेतकऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत सर्वांवर परिणाम होणार आहे.

दरम्यान, नॅशनल इनोव्हेशन्स इन क्लायमेट रिसायलेंट ग्रिकल्चरच्या अंदाजानुसार, २१०० पर्यंत गव्हाच्या उत्पादनात ६ ते २५ टक्क्यांनी घट होऊ शकते, तर २०८० पर्यंत तांदळाचे उत्पादन १० टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे. देशात सध्या गहू आणि तांदळाचे उत्पादन अनुक्रमे ११३.२९ दशलक्ष टन व १३७ दशलक्ष टन आहे, पण भविष्यात त्यात मोठी घट होऊ शकते.

## कामगारमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्याचे कामगारमंत्री ॲड. आकाश फुंडकर हे दि. ११ व १२ जानेवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौऱ्यानुसार, दि. ११ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता शेगांव येथे आगमन व संत सावता भवन, खामगांव रोड, शेगांव येथे आयोजित माळी समाजाच्या राज्यस्तरीय युवक-युवती परिचय महासंमेलनास उपस्थिती, दि. १२ जानेवारी रोजी सकाळी ६.४० वाजता श्री लखुजी राजे राजवाडा परिसर, सिंदखेड राजा येथे राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमास उपस्थिती, त्यानंतर सकाळी ७.३० वाजता शिर्डी जि.अहिल्यानगरकडे प्रयाण करतील.

## यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्:मय पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ:मय पुरस्कार योजनेतंर्गत निवड अंती सन २०२४ चे राज्य वाङ्:मय पुरस्कार प्रदान करण्यासाठी दि. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रकाशीत झालेल्या प्रथम आवृत्ती पुस्तकासाठी दि. ३१ जानेवारी २०२५ प्रवेशिका मागविण्यात येत आहे. पुरस्कार नियमावली नुसार पात्र लेखक, प्रकाशक यांना या योजनेत भाग घ्यावयाचा असल्यास त्यांनी प्रत्येक प्रवेशिका प्रपत्रासोबत आपल्या पुस्तकांच्या दोन प्रती विहती नमुन्यातील अर्जासह स्थानिक निधी शाखा जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा सादर करावे, असे आवाहन तहसिलदार यांनी केले आहे.

## बारावीच्या परीक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाईन उपलब्ध



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षा फेब्रुवारी – मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना ही प्रवेश पत्रे ऑनलाइन पद्धतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर शुक्रवार दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी 'ॲडमिट कार्ड' या लिंक द्वारे डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध होतील, असे राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी कळविले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक / प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांना याबाबत सूचित करण्यात आले आहे. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत करण्यात आले आहे.

## येरवड्यात दहशत माजविणारा गुंड प्रफुल्ल कसबेच्या साथीदारांची धिंड

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये (मोक्का) केलेल्या कारवाईत जामीन मिळाल्यानंतर येरवड्यातील गुंड प्रफुल्ल कसबे आणि साथीदारांनी फेरी काढून दहशत माजविली. पोलिसांनी याप्रकरणी कसबे याच्यासह ३५ ते ४० साथीदारांविरुद्ध गुन्हा केला. कसबे याच्या साथीदारांना पोलिसांनी पकडले. येरवड्यातील लक्ष्मीनगर परिसरात त्यांची धिंड काढून त्यांना चोप दिला. पोलिसांनी चौकात तात्पुरता मंडप उभा करुन पडद्याआड नागरिकांच्या समक्ष त्यांना चोप दिल्याने पोलिसांच्या कारवाईचे नागरिकांनी कौतुक केले.

## कल्याणमधील सेक्स रॅकेटचा पर्दाफाश! वेश्या व्यवसायातून १३ महिलांची सुटका

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण स्टेशनजवळ होत असलेल्या बेकायदेशीर वेश्या व्यवसायातून १३ महिलांची सुटका करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. महात्मा फुले पोलिसांनी कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात गुरुवारी छापा टाकला आहे. या छाप्यात पोलिसांनी वेश्याव्यवसायात ढकलल्या गेलेल्या १३ महिलांचीही सुटका केली आहे.तक्रारींच्या आधारे कारवाई करत पोलीस पथकाने कल्याण रेल्वे स्थानकाजवळ छापा टाकला. यावेळी, तीन महिलांसह चार आरोपींना ताब्यात घेण्यात आलं. पोलिसांच्या माहितीनुसार, परिसरातील एसटी बस स्टॉपच्या मागे उघड्यावर बेकायदेशीरपणे हे काम सुरू होतं. या कारवाईत पोलिसांना बेकायदेशीर रॅकेटचा पर्दाफाश करण्यात यश आलं आहे.

## आता मुलाने पतंग उडवला तर आईबाप जाणार तुरुंगात, पुणे पोलिसांचा मोठा निर्णय, कारण काय?

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** मकरसंक्रांत जसजशी जवळ येत आहे, तसतशी पतंग, मांजा विक्री दुकानांवर गर्दी वाढू लागली आहे. कायद्याने बंदी असलेला जीवघेणा नायलॉन मांजा चोरट्या मार्गाने विक्री केला जात आहे. त्यामुळेच महापालिका तसेच पोलीस प्रशासनाकडून सातत्याने अवैधरित्या नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांविरुद्ध जिल्हाभरात कारवाई सुरूच आहे. महापालिका आणि स्थानिक पोलिसांकडून मागील १५ दिवसात अनेक ठिकाणी कारवाया केल्या असून लाखो रुपयांचा नायलॉन मांजा जप्त केला आहे. तरीही रस्त्यावर अनेक ठिकाणी नायलॉन मांजाचा वापर करत पतंग उडवल्याचं उघडकीस आलं आहे.



पुण्यात तीन दिवसांपूर्वी नायलॉन मांजा गळ्यात अडकून गळा कापल्याने एका तरूणाला ३२ टाके पडलेत. तर कात्रजचे रहिवासी असलेले सतीश फुलारी हे १५ दिवसांपूर्वी मुलीला शाळेतून घेऊन दुपारी घरी परत चालले होते. दरम्यान, कात्रज-कोंढवा रस्त्यावर नायलॉन मांज्याने गळ्याला विळखा घातल्याने त्यांचा गळा चिरला. त्यांना तब्बल १५ टाके पडले. दैव बलवत्तर म्हणून त्यांचा जीव वाचलाय. नायलॉन मांजामुळे होणारे अपघात पाहता, पुणे पोलीस ॲक्शन मोडमध्ये आली आहे.

आता अल्पवयीन मुलं नायलॉन मांजा वापरून पतंग उडवताना आढळून आली. त्यांच्या आई वडिलांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली जाणार आहे. पुणे पोलिसांनी याबाबतचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मकर संक्रांतीत आपलं मूल पतंग उडवत असेल तर तो त्यासाठी कोणता दोरा वापरतो, यावर पालकांना लक्ष ठेवावं लागणार आहे. तसं न केल्यास थेट आई वडिलांवर गुन्हे दाखल होणार आहेत. यामुळे आई वडिलांना तुरुंगात जाण्याची वेळही येऊ शकते, असं पुणे पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे.

खरं तर, महाराष्ट्रात देशात अनेक ठिकाणी नायलॉन मांजावर बंदी घालण्यात आली आहे. तरीही अनेक ठिकाणी नायलॉन मांजाची छुप्या पद्धतीने सर्रास विक्री होत असल्याचं समोर येत आहे. मांजामुळे गळा कापून अनेकांना आयुष्यभराची दुखापत होत आहे. हे सगळे अपघात पाहता आता पालकांवर जबाबदारी निश्चित करण्याचा निर्णय पुणे पोलिसांनी घेतला आहे. गुन्हे शाखेच्या उपायुक्तांनी याबाबतची पोलिसांची भूमिका जाहीर केली आहे.

## लाडक्या बहिणींची संक्रांत गोड होणार!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची राज्यभरात प्रचंड चर्चा आहे. या योजनेच्या माध्यमातून गेल्या २०२४ या वर्षी असंख्य महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रूपये जमा झाले होते. हे पैसे आता महिलांना नवीन वर्षात देखील मिळणार आहेत. जानेवारीमध्ये महिलांच्या खात्यात सातवा हप्ता मिळणार आहे.हे पैसे लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा करण्यासाठी सरकार संक्रातीचा मुहूर्त साधण्याची शक्यता आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींची संक्रांत गोड होणार आहे.**

राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेची सुरूवात जुलै महिन्यापासून केली होती. त्यानंतर योजनेची अर्ज प्रक्रिया राबवून राज्य सरकारने दर महिन्याला महिलांच्या खात्यात १५०० रूपये जमा केले होते. अशाप्रकारे आता डिसेंबर २०२४ पर्यत सरकारने महिलांच्या खात्यात ९००० रूपये जमा केले आहेत.



आता नवीन वर्षात जानेवारी महिना उजाडला आहे. आणि महिलांना त्यांच्या नवीन हप्त्याची प्रतिक्षा लागली आहे. पण तो किती तारखेला महिलांच्या खात्यात जमा होणार आहे, याची अद्याप तरी माहिती मिळू शकलेली नाही.पण राज्य सरकार लाडक्या बहिणींना गोड बातमी देण्याच्या तयारीत आहे.गोड यासाठी कारण सरकार सातव्या हप्त्यासाठी मकरसंक्रातीचा मुहूर्त साधण्याची शक्यता आहे. सरकार महिलांना मकरसंक्रातीच्या मुहूर्तावर पैसे पाठवणार असल्याची माहिती सुत्रांकडून मिळतेय. त्यामुळे या मुहूर्तावर जर खरंच सरकारच्या खात्यात पैसे आले तर लाडक्या बहिणींची संक्रात आणखीण गोड होणार आहे.

दरम्यान पुढच्या आठवड्यात १४ जानेवारीला मकरसंक्रात आहे. याच मकरसंक्रातीच्या मुहूर्तावर सरकार लाडकी बहीणचे पैसे पाठवणार असल्याची माहिती समोर आली आहे.त्यामुळे महिलांना आता या हप्त्याची उत्सुकता लागली आहे.

दरम्यान मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या अर्जाची छाननी सरकारने सूरू केली आहे. त्यानुसार ज्या महिला निकषात बसणार नाहीत त्या महिलांना त्यांचे पैसे सरकारला परत करावे लागणार आहे. त्यात राज्यातील अनेक शेतकरी महिला आहेत, ज्या नमो शेतकरी सन्मान योजनेचा लाभ घेत आहेत. त्या शेतकरी महिलांचे अर्ज आता बाद होण्याची शक्यता आहे. कारण सरकारने ज्या महिला इतर सरकारी योजनांचा लाभ घेत आहेत, त्यांना १५०० रूपये न मिळण्याची तरतूद आहे. त्या या शेतकरी महिलांना मोठा धक्का बसला आहे.

# नायलॉन मांजा विक्रेत्यांवर कडक कारवाई करण्याच्या विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सूचना

दैनिक आपला विदर्भ

## नायलॉन मांज्याचा उपयोग टाळण्यासाठी जनजागृती करा

**मुंबई/प्रतिनिधी :** नायलॉन मांजामुळे राज्यात काही भागात नागरिक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. काही प्रकरणात तर जीवितहानी झालेली आहे. अशा घटना टाळण्यासाठी नायलॉन मांजाच्या उत्पादनावर बंदी आणत राज्यात ज्या ठिकाणांहून तसेच ऑनलाइन मांजा विक्री केली जात आहे, अशा ठिकाणी सक्त कारवाई करण्यात यावी. मांजाच्या उपयोग टाळण्यासाठी जनजागृती करण्यात यावी, अशा सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज दिल्या.

उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी मुंबई, ठाणे, नाशिक, जळगाव, धुळे पुणे, छत्रपती संभाजीनगर महानगर पालिका क्षेत्रातील नायलॉन मांजा उपयोगावरील प्रतिबंधात्मक कारवाईबाबत दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. बैठकीला पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव विनीता सिंघल, मुंबई मनपा आयुक्त भूषण गगराणी, पोलीस उपायुक्त (उपक्रम) श्री. पठाण, छ. संभाजीनगर पोलीस आयुक्त प्रवीण पवार, ठाणे पोलीस आयुक्त प्रशांत परबकर, नाशिक पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, धुळे अतिरिक्त पोलीस अधिक्षक किशोर काळे, पुणे सह पोलीस आयुक्त रंजन कुमार, जळगांवचे अति. पोलीस अधिक्षक अशोक नकाते दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

नायलॉन मांजाच्या उपयोगाबाबत जनजागृती करण्याचे सांगत उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, महानगरांमध्ये गर्दीच्या ठिकाणी लाऊड स्पीकर, पोस्टर्स आदींद्वारे जनजागृती करावी. मात्र यामुळे नागरिकांचा उत्साह कमी होणार नाही, याची दक्षता घ्यावी. संभाजीनगर पोलीस आयुक्तांनी चांगल्या संकल्पना राबविलेल्या आहेत. त्याचा अन्य महापालिका, पोलीस आयुक्त यांनी अवलंब करावा. दुचाकीला यु कमान लावण्यातबाबत तपासून घेण्यात यावे. तसेच मांजा विक्री, उत्पादन किंवा मांजामुळे घडणाऱ्या घटनांची माहिती देण्यासाठी टोल फ्री क्रमांक जारी करण्यात यावा.

वाहतूक पोलीसांनी नायलॉन मांजावरील कारवाईबाबत अलर्ट असावे. रस्त्यांवर आपत्कालीन पथकांची नेमणूक करावी. वेगात वाहन असताना मांजा गळ्याला लागून दुर्घटना झाल्याचे निदर्शनास येते. अशा वेळी जखमी व्यक्तीला मदत करण्यासाठी यंत्रणा निर्माण करावी. जेणेकरून जखमी व्यक्तीला तातडीने वैद्यकीय मदत मिळेल, अशा सूचनाही यावेळी उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी दिल्या. बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईची आणि प्रतिबंधात्मक उपायोजनांची माहिती दिली.



## भारत मातेचे थोर सुपुत्र ; लाल बहादूर शास्त्री

भारतमातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा आज ५९ वा स्मृतिदिन आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वे मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. आज ५९ व्या स्मृतिदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

## ‘सिनेमाने शास्त्रीय संगीताचं नुकसान केलं’, सुबोध भावे स्पष्टच बोलला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** संगीत मानपमान हा २०२५ वर्षात रिलीज होणारा पहिला मराठी सिनेमा आहे. आज १० जानेवारी रोजी हा सिनेमा संपूर्ण महाराष्ट्रात रिलीज झाला आहे. अभिनेता सुबोध भावे आणि अभिनेत्री वैदेही परशुराम या सिनेमात प्रमुख भुमिकेत आहेत. अनेक वर्षांनी मराठीत एक सांगितिक सिनेमा प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. या सिनेमाच्या प्रमोशनच्या निमित्ताने अभिनेता सुबोध भावे जो या सिनेमाचा दिग्दर्शकही आहे त्याने अनेक मुलाखती दिल्या. मुलाखतीत बोलताना भारतीय शास्त्रीय संगीताला सिनेमात कधीच मानाचं स्थान मिळालं नसल्याची खंत व्यक्त केली.

रेडिओ सिटी मराठीशी बोलताना सुबोध भावे म्हणाला, ''भारतीय शास्त्रीय संगीताला आजपर्यंत सिनेमाने कधी न्याय दिला नाही असं माझं स्पष्ट म्हणणं. या कलांचं नुकसान करण्याचं काम सिनेमानं केलं आहे. कारण भारतीय शास्त्रीय संगीत जेव्हा जेव्हा चित्रपटात आलं तेव्हा ते विनोदी पद्धतीने आलं. एखादी विनोदी व्यक्तिरेखा दाखवायची असेल तर त्यात नक्कल करून गाताना दाखवली जाते. नकळत आपण त्या कलेचा आणि त्या कलाकारांचा अपमान करत असतो. कारण तुम्हाला त्याची जाणीव झालेली नसते तुम्हाला त्याची किंमत कळलेली नसते.''

सुबोध पुढे म्हणाला, ''मला असं वाटलं की हीच वेळ आहे की ज्या संगीताने माझा काही संबंध नसतानासुद्धा मला पछाडून टाकले याचा अर्थ त्या संगीतामध्ये किती अफाट जादू आहे आणि जी जादू मला गाण्यातलं काही कळत नसताना सुद्धा तसा आनंद घेऊ शकतो. माझ्यासारखे शेकडो लोक आहेत ज्यांना गाण्यातलं काहीच कळत नाही पण तरीसुद्धा आनंद घेऊ शकतता. ही जाणीव शास्त्रीय संगीत नाट्यसंगीतने मला करून दिली.''


''कट्यारमधून शंकर जी आणि माझं ठरलं की पुन्हा एकदा म्युझिकल करायचं. त्यातून विषयाचा शोध सुरू झाला आणि तो शोध संगीतमानपमान पर्यंत पोहोचला आणि आज तो चित्रपट तुमच्या भेटीला येतोय'', असंही सुबोधने सांगितलं.

या सिनेमात अभिनेकता सुबोध भावे आणि वैदेही परशुरामी यांच्यासोबत सुमित राघवन, उपेंद्र लिमये, नीना कुलकर्णी, निवेदिता सराफ, शैलेश दातार, अर्चना निपाणकर आदी कलाकार प्रमुख भूमिकेत आहेत.

# चार कोटींच्या विकास कामांचे माजी आ. संजय रायमुलकर यांच्या हस्ते आंध्रुड येथे लोकार्पण







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** अंधृड येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सौंदर्यीकरण,सभामंडप , सिमेंट रस्ता आदींचे लोकार्पण व अंधृड ते नागापुर या तीन कोटी खर्चाच्या कामाचे भूमिपूजन अशा चार कोटींच्या कामांचे लोकार्पण माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते आज पार पडले.

संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून ही सर्व विकासकामे मंजूर झालेली होती. आचार संहिता सुरू झाल्याने येथील लोकार्पण आणि काही कामांचे भूमिपूजन निवडणूक काळात करता आले नाही.ग्राम पंचायतीने आज या सोहळ्याचे आयोजन केले होते.

२८ लाखांच्या तलाठी भवनाचे लोकार्पण संजय रायमुलकर यांच्या हस्ते झाले.सिमेंट नाला व रस्ता बांधकाम , छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सौंदर्यीकरण , मागासवर्गीय वस्तीतील सिमेंट रस्ता लोकार्पण , ३ कोटी रुपये खर्चाच्या अंधृड ते नागापूर रस्त्याचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. महादेव मंदिर जवळ २१ लाख रुपये खर्चून बांधण्यात यावयाच्या सभामंडपाचे भूमिपूजन करण्यात आले.या निमित्ताने आयोजित जाहीर सत्कार कार्यक्रमात बोलतांना शिवसेना उपजिल्हा प्रमुख दिलीपराव देशमुख म्हणाले की, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून या गावात ३० कोटींची विकास कामे झाली. थोडक्यात मतांनी विधानसभा निवडणुकीत रायमुलकर पराभूत झाले. हा त्यांचा पराभव नसून एक प्रकारे जनतेचाच पराभव आहे पुढे होणाऱ्या विकास कामांना त्यामुळे खिळ बसली आहे.

शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश वाळूकर, जितुभाऊ सावजी, शरद देशमुख ,विष्णू पाटील ,नायबराव देशमुख, भागवत देशमुख ,सुमित पाटील ,माणिकराव देशमुख, संतोष जागृत ,दिनकर चव्हाण ,नारायण देशमुख, नंदू सावजी,नितीन गा,योगेश सौभागे,आकाश ढोरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अरुण देशमुख, अतुल देशमुख, पी आर देशमुख, विजय देशमुख, किशोर वैद्य ,सरपंच बाळासाहेब देशमुख, पंडितराव देशमुख ,सुधाकर देशमुख, संजयराव देशमुख, राहुल देशमुख ,साहेबराव देशमुख, भिकनराव देशमुख, कैलास देशमुख ,पंजाबराव देशमुख आदींनी पाहुण्यांचे स्वागत केले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात संजय रायमुलकर म्हणाले की, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सदैव निरपेक्षपणे माणुसकी हा एकच धर्म मानून सेवेचे कार्य केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्यातून चार हजार कोटींपेक्षा जास्त कामे मेहकर मतदार संघात आणता आली. राज्य आणि केंद्रात आपलेच सत्ता असल्याने यापेक्षाही मोठ्या प्रमाणावर विकास कामे मेहकर, लोणार तालुक्यात आणली जातील अशी ग्वाही त्यांनी दिली. विदर्भात सर्वाधिक सभामंडपाची कामे मेहकर मतदार संघात करण्यात आली. पेनटाकळीच्या कालव्यासाठी ५८५ कोटी मंजूर करून आणले. मेहकर शहरात ९०० कोटींची विकास कामे झाली. समृद्धी जवळील नवनगर उभारणीसाठी आलेल्या अडथळ्यांवर मार्ग काढण्यात येईल, असेही ते म्हणाले.

आम्ही जी कामे मंजूर करून आणली त्याची भूमिपूजन व लोकार्पण आम्ही करणार आहोत. नवीन लोकप्रतिनिधीने नव्याने कामे मंजूर करून आणून ती पूर्ण करावीत, असे सांगून रायमूलकर म्हणाले की, आमच्या कामांचे श्रेय त्यांनी घेऊ नये. एक लाख मतदारांनी आम्हाला मते दिली असल्याने त्यांच्या सेवेसाठी आपण अहोरात्र कार्यरत राहणार आहोत . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्जेराव देशमुख यांनी केले, तर संजय महाराज यांनी आभार मानले.

# भाजप-शिंदेंकडून ठाकरेंच्या वाघांची शिकार? बालेकिल्ल्यातील शिलेदार साथ सोडण्याच्या तयारीत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या पराभवानंतर शिवसेना ठाकरे गटाने मुंबई महापालिकेसह आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर लक्ष केंद्रीत केले आहे. मागील काही दिवसांपासून मातोश्रीवर विभागनिहाय बैठक सुरू होती. या बैठकांमध्ये मुंबई महापालिकेच्या निवडणुकीबाबत चर्चा करण्यात आली. तर, दुसरीकडे ठाकरे गटाच्या माजी नगरसेवकांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे. पक्षाकडून नगरसेवकांना विश्वासात घेतलं जात नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.

मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना ठाकरे गटाच्या माजी नगरसेवकांचा नाराजीचा सूर आवळला आहे. मुंबई महानगर पालिकेच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाच्या मातोश्रीवरील आढावा बैठका संपन्न झाली. मात्र, शिवसेना ठाकरे गटाच्या माजी नगरसेवकांमध्ये नाराजी दिसून येत आहे. पक्षाकडून माजी नगरसेवकांना विश्वासात घेतलं जात नसल्याने ही नाराजी दिसून येत आहे.

मातोश्रीवर होणाऱ्या पदाधिकारी आढावा बैठकीत देखील माजी नगरसेवकांना बोलवलं जात नसल्याने अनेक माजी नगरसेवकांनी नाराजी दर्शवली असल्याचे सूत्रांनी सांगितले. तसेच विधानसभा निवडणुकीत देखील विधानसभा मतदार संघात उमेदवार देताना माजी नगरसेवकांना विश्वासात घेतलं नव्हतं. त्याचा फटकाही पक्षाला बसला असल्याचे माजी नगरसेवकांनी म्हटले. आगामी महानगर पालिकेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपला मोठं यश मिळाल्याने शिवसेना ठाकरे गटाचे अनेक माजी नगरसेवक भाजपच्या वाटेवर असल्याची माहिती सूत्रांनी दिली. शिवसेनेत दोन गट पडल्यानंतर ठाकरे गटातील माजी नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत पक्ष प्रवेश करत होते. मात्र आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेने सोबतच भाजपच्याही वाटेवर असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

२०१७ साली एकसंध शिवसेनेचे ८४ नगरसेवक निवडून आले होते. त्यानंतर मनसेच्या ६ नगरसेवकांनी संयुक्त शिवसेनेत पक्ष प्रवेश केला. शिवसेनेत २ नगरसेवक कोर्टातील प्रक्रियेच्या माध्यमातून निवडून आले. मुंबई महापालिकेत शिवसेनेची सत्ता आल्यानंतर शिवसेनेला ७ अपक्ष नगरसेवकांनी पाठिंबा दिला. या सर्व नगरसेवेकांच्या पाठिंब्यावर शिवसेनेचे एकूण नगरसेवक ९९ झाले होते. त्यापैकी आता शिवसेना ठाकरे गटामध्ये ६३ माजी नगरसेवक आहेत. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर त्यांच्या शिवसेनेत ३६ माजी नगरसेवक आहेत. यामध्ये स्थायी समिती अध्यक्ष, आरोग्य समिती अध्यक्षांसह माजी नगरसेवकांचा समावेश आहे. त्यामुळे मुंबईचा बालेकिल्ला वाचवणे ठाकरेंना आव्हानात्मक असणार आहे.

## मुख्यमंर्त्याच्या चंद्रपूर दौऱ्यात राजकीय नाराजीनाट्य; विजय वडेट्टीवारांना मानाचे पान; सुधीर मुनगंटीवार नाराज?

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पहिल्यांदाच चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. मात्र त्यांच्या या दौऱ्यात माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित राहतील का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्याचे दुसरे मुख्यमंत्री आणि चंद्रपूर जिल्ह्याचे सुपुत्र मा.सा. कन्नमवार यांची आज १२५वी जयंती आहे. या १२५व्या जयंतीनिमित्त राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज चंद्रपूरला येणार आहेत. विशेष म्हणजे चंद्रपूरचे भाजप आमदार किशोर जोरगेवार हे या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक आणि स्वागताध्यक्ष आहेत आणि या कार्यक्रमाला चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व आजी माजी खासदार-आमदार यांना निमंत्रित करण्यात आलं आहे. मात्र या कार्यक्रमाला भाजपचे जेष्ठ नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित राहणार का याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

# संयम व सहनशक्तीची अपूर्व देणगी राजकारणाने मला दिली - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## जिव्हाळा पुरस्कार वितरण सोहळ्यात ज्येष्ठ संपादक विवेक घळसासी यांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी उलगडले भावविश्व

दैनिक आपला विदर्भ





**नागपूर/प्रतिनिधी :** धरमपेठ महिला को-ऑपरेटिव्ह सोसायटी येथे आयोजित या समारंभास संस्थेच्या अध्यक्षा निलिमा बावणे, अविनाश संघवई, नागेश पाटील, श्रीधरराव गाडगे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थी चळवळीत असताना मला राजकारणात येण्याची अजिबात इच्छा नव्हती. एक स्वयंसेवक म्हणून आपल्या परिने समाजाला योगदान द्यायचे हे मी निश्र्चित केलेले होते. स्वयंसेवकाला जे सांगितले ते त्याने करायचे असते असे विलासजी फडणवीस यांनी सांगून मला काही पर्याय ठेवला नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राजकारणात सहनशक्तीचा कस लागतो. समाजात जे काही चांगले दिसले त्यापासून मी शिकत आलो आहे. सामाजिक उत्तरदायित्वाच्या दृष्टीकोनातून जे प्रकल्प हाती घेतले ते त्याच शिकवणुकीतून मी पूर्ण करत आलो. स्वर्गीय विलासजी फडणवीस यांच्यातील उपक्रमशीलतेचा गुण मी अंगिकारला असे सांगून त्यांनी त्यांच्या कार्याला उजाळा दिला. कॅन्सर इन्स्टिट्यूटपासून इतर संस्था या समाजाला योगदान देणाऱ्या अशा व्यक्तींप्रतिची एक कृतज्ञता असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्रीपदाची संधी मला मधल्या काळात मिळाली होती. आपण ज्या संस्कारातून आलो त्या संस्कारात पदाला महत्त्व नाही हे मी माझ्या मनावर कायमचे बिंबविले आहे. कोणतेही पद हे आपल्या सुखासाठी नाही तर ज्यांच्यासाठी आपण पदावर आलो, त्या घटकांना सुखी करण्याचे पद हे माध्यम आहे अशी माझी मनापासून धारणा आहे. या धारणेमुळे मी तेव्हा मुख्यमंत्री पद स्वीकारले नाही. बाहेर राहूनच आपण चांगले काम करु, असा माझा त्यावेळी समज होता. परंतु सत्ताबाह्य राहून लोकशाहीला अभिप्रेत नसलेल्या केंद्रातून कामे करण्यापेक्षा सत्तेत उपमुख्यमंत्री राहून लोकशाहीच्या मूल्यात्मक आदरापोटी ती जबाबदारी स्वीकारली असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्राची राजकीय संस्कृती ही आपण आणली पाहिजे. सर्वसामान्यांचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा अधिक सकारात्मक, आश्र्वासक झाला पाहिजे यादृष्टीने मी आता मुख्यमंत्री झाल्यानंतर अगोदर हे जाहीर केले आहे . कोणत्याही खोट्या आरोपातून केलेल्या नकारात्मक वातावरणाला आता समाज मान्यता देत नाही हे या निवडणुकीतून सिद्ध झाले आहे. एका दृष्टीने कलूषित झालेल्या राजकारणाला लोकांनीच शुद्ध करण्याकरिता घेतलेला हा पुढाकार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. राजकारणात कोणीही कायमचे शत्रू नसतात. राजकारणात काहीही होऊ शकते. सकाळचा शपथविधी नको म्हणून यावेळी आम्ही सायंकाळी शपथविधी ठेवला असे एका प्रश्र्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितल्यावर सभागृहात हशा पिकला.

माझ्या कुटुंबाने सहनशक्ती धैर्याने पेलून दाखविली आहे. माझी मुलगी ही प्रचंड समंजस असून तिच्या उत्तराने मीही स्तब्ध होतो. राजकारणापलीकडे जाऊन ती साऱ्या बाबी पाहते याचे मला प्रचंड समाधान आहे. आमच्या संसारात आम्ही दोघांनी एक तत्व पाळले आहे. ज्याला जे आवडते ते केले पाहिजे. हे विचारस्वातंत्र्य आम्ही सन्मानाने जपतो, असे त्यांनी आपल्या व्यक्तिगत जीवनावर विचारलेल्या प्रश्र्नाला उत्तर देताना सांगितले.

जिव्हाळा पुरस्कार वितरण

स्वर्गीय विलासजी फडणवीस यांच्या जयंतीनिमित्त जिव्हाळा बहुउद्देशीय विकास संस्थेच्या जिव्हाळा पुरस्कारांचे यावेळी वितरण करण्यात आले. अकोला येथील गायत्री बालिका आश्रम व नागपूरच्या संवेदना परिवाराला प्रत्येकी एक लाख रुपयांचा पुरस्कार देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### मला शुभदाला ठार मारायचं नव्हतं; पुण्याच्या आयटी कंपनीतील तरुण पोलीस चौकशीत काय म्हणाला?

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :**पुण्याच्या विमाननगर परिसरातील एका बीपीओ कंपनीत काम करणाऱ्या शुभदा कोदारे या तरुणीला तिचा सहकारी असलेल्या कृष्णा कनौजा या तरुणाने ठार मारल्याची घटना नुकतीच घडली होती. कृष्णा कनौजा याने शुभदावर कंपनीच्या आवारातच चाकूने वार केले होते. यानंतर शुभदाला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, अतिरक्तस्रावामुळे तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर कृष्णा कनौजा याला पोलिसांनी अटक केली होती. पोलिसांकडून चौकशी होत असताना कृष्णा कनौजा याने एक महत्त्वाची गोष्ट सांगितली.

शुभदा मी तिला दिलेले पैसे वारंवार मागूनही परत देत नव्हती. मी तिला चाकूने धमकविल्यावर कंपनीतील अधिकारी किंवा पोलिस माझी दखल घेतील आणि पैसे परत मिळतील, या आशेने मी चाकू घेऊन आलो होतो. पण या हल्ल्यात तिचा मृत्यू होईल असे वाटले नव्हते, असे कृष्णा कनौजा याने सांगितले. कृष्णा कनौजा याला न्यायालयाने १३ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवले आहे. पोलिसांकडून सध्या त्याची कसून चौकशी केली जात असून त्यामधून या हत्याप्रकरणाचा संपूर्ण तपशील समोर येत आहे.

शुभदा कोदारे हिने आर्थिक अडचण असताना अनेकदा कृष्णाकडून पैसे घेतले होते. गेल्या दोन वर्षांमध्ये कृष्णाने शुभदाला तब्बल चार लाख रुपयांची आर्थिक मदत केली होती. मात्र, कृष्णाला डोळ्याची शस्त्रक्रिया करायची असल्याने तो शुभदाकडे सतत पैशांची मागणी करीत होता; पण शुभदा पैसे परत देत नव्हती. त्यामुळे कृष्णा आणि शुभदा यांच्यात कामाच्या ठिकाणी वादही झाला होता. शुभदा कोदारे हिने सहकारनगर पोलिस ठाण्यात कृष्णाच्या विरोधात तक्रार अर्ज दिला होता. पोलिसांनी कृष्णाला ठाण्यात बोलावून समज दिली होती. त्यामुळे कृष्णा हा शुभदावर चिडून होता. मंगळवारी सायंकाळी शुभदा कामाला येण्यासाठी डब्ल्यूएनएस कंपनीच्या पार्किंगमध्ये आली असताना कृष्णाने धारदार चाकूने तिच्या हातावर पाच वार केले. हल्ल्यात मोठया प्रमाणावर रक्तस्राव झाला आणि रात्री उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला, अशी माहिती वरिष्ठ निरीक्षक रवींद्र शेळके यांनी दिली आहे.

### नाशकात भूताने रस्ता अडवला, चालकाला मारहाण?

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकच्या निफाड तालुक्यातील शिरवाडे गावाजवळ एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. येथील शिरवाडे ते धामोरी रस्त्यावर नदीजवळ भूत दिसल्याची चर्चा गावात पसरली आहे. त्यामुळे या रस्त्यावरून जाण्यास गावकरी घाबरत आहेत. इथे एका वाहनचालकाला भूत दिसलं आणि भूताने चालकाला मारहाण केल्याची चर्चा गावात आहे. याबाबतचे काही फोटोज आणि व्हिडीओज देखील सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यामुळे शिरवाडे गावासह आसपासच्या परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. पण या जगात भूत नसते, सोशल मीडियावर व्हायरल होणारे फोटोज आणि व्हिडीओज बनावट असल्याचा दावा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून करण्यात आला आहे.

नेमकं प्रकरण काय आहे?

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्याच्या शिरवाडे–धामोरी रस्त्यावर एका वाहन चालकाला भूत दिसले आणि भुताने त्या चालकाला मारहाण केली, अशी अफवा धामोरी परीसरात मोठ्या प्रमाणात पसरली आहे. या रस्त्यावर भूत असल्याचं खरं वाटावं म्हणून काही फोटो आणि व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल करण्यात येत आहेत. संबंधित व्हिडीओमध्ये रडण्याचे आवाज ऐकायला येत, असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

तर वाहन चालकाच्या पाठीवर गंभीर जखमा झाल्याचे फोटोत दिसून येत आहे. या घटनेची दखल महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने घेतली आहे. जगामध्ये भूत अस्तित्वात नसते. तरीही त्याची भीती दाखवली जाते, कारण भूत हे मनात असतं. लहानपणापासून अशा गोष्टींचा मनावर पगडा बसलेला असतो. नागरिकांनी घाबरुन जाऊ नये, असे आवाहन अंनिसचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी केले आहे.

फोटोचे निरक्षण केल्यावर ते बनावट असल्याचे लक्षात येते. सदर चित्रफित आणि फोटो एडीट केलेले असल्याचे स्पष्ट होते. शिवाय हे फोटो गेल्या काही दिवसांत अनेक ठिकाणचे व्हिडीओज म्हणून सोशल मीडियावर व्हायरल होत असल्याची देखील चर्चा आहे. महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते अमावशेच्या रात्री संबंधित ठिकाणी उपस्थित राहून दाखवणार आहे. त्यामुळे लोकांच्या मनातील भुताची भीती जाण्यास मदत होईल आणि यातला फोलपणा लक्षात येईल, असं अंनिसकडून सांगण्यात आलंय.

### रोहित शर्मा नंतर 'हा' खेळाडू होणार भारतीय क्रिकेट टीमचा कर्णधार

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉर्डर गावस्कर ट्रॉफी मॅच दरम्यान भारताचा कर्णधार रोहित शर्मा हवी तशी कामगिरी करु शकलेला नाही. त्यामुळे रोहितला कर्णधार पदावरून काढून टाकण्याची मागणी जोर धरू लागली आहे. रोहित शर्माच्या अनुपस्थित जसप्रीत बुमराहने टीमच्या नेतृत्वाची कामगिरी हाती घेतलीय. अशातच आता रोहित शर्मानंतर भारतीय कसोटी संघाचा कर्णधार कोण? असा प्रश्न उपस्थित होत असताना सुनील गावसकर यांनी याबाबत मोठे वक्तव्य केले आहे.

गावसकरांच्या मते रोहित शर्मा नंतर भारतीय कसोटी संघाचा उत्तम कर्णधार जसप्रीत बुमराह होऊ शकतो. नुकताच पार पडलेल्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफी दरम्यान बुमराह चमकला होता. त्याने त्याच्या गोलंदाजीने ३२ गडी बाद केले होते.

सुनील गावसकर यांनी माध्यमांशी चर्चा करताना म्हटले की, ' जसप्रीत बुमराह भारतीय कसोटी संघाचा कर्णधार होऊ शकतो. तो संघाची जबाबदारी घेऊन नेतृत्व करतो.

# 'शिवसेना झोपेतून उठायला तयार नाही तर काँग्रेस...'; अमोल कोल्हेंची पवारांसमोरच मित्र पक्षांवर टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींपूर्वीच पुन्हा एकदा महाविकास आघाडीमधील घटकपक्षांमधील वाद चव्हाट्यावर आल्याचं चित्र सध्या पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी गुरुवारी मुंबईत झालेल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीमधील भाषणात महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला टोला लगावला आहे.

''लोकसभा निवडणूक लढवायची होती त्यावेळीच चित्र डोळ्यासमोर आलं. लोकसभा निवडणुकीत आपल्या अपेक्षा वाढल्या होत्या त्यामुळे अपेक्षा भंग झाला असं चित्र रंगवल जातं. मात्र तसं नाही. लोकसभा निवडणुकीत लोक आपल्या सोबत कुणी नव्हतं. त्यावेळी सुप्रिया सुळे आणि मी म्हणालो फार फार तर काय होईल तर पराभव होईल परंतु त्यानंतर चित्र बदललं. त्यानंतर एक ठेच लागली त्यामुळे कुणी विचारधारेला तिलांजली देणार का? मागच्या चार–पाच दिवसापासून मर्जरच्या चर्चा सुरू आहेत. मात्र गरज आपल्याला आहे की त्यांना आहे?'' असा सवाल कोल्हे यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यावरुन आपल्या भाषणातून उपस्थित केला. ''लढण्याची खूमखुमी तेव्हाच जास्त असते तेव्हा आपल्याकडे काहीच नसतं,'' असंही अमोल कोल्हे म्हणाले.

मित्र पक्षांबद्दल बोलताना अमोल कोल्हेंनी, ''राज्यातील परिस्थीत पाहिली तर शिवसेना अजून झोपेतून जागी व्हायला तयार नाही. काँग्रेसची मोडलेली पाठ सरळ व्हायला तयार नाही. आपल्याकडे लढणारे शरद पवार आहेत. महाराष्टात ६० लाख लाडक्या बहीणींची संख्या कमी होणार आहेत. त्यामुळे आता आपल्याला लढायला संधी आहे,'' असंही विधान केलं. ''स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत पीपाणी चिन्ह नाही. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात ईव्हीएम मॅनिप्युलेशन होणार नाही,'' असा विश्वास अमोल कोल्हेंनी व्यक्त केली.

''गावागावात जर ग्रामसभेत ठराव करण्यात आला आणि त्यांनी बॅलेट पेपरवर आणि मशीनवर पर्याय समोर ठेवा अशी भूमिका घेतली तर सुप्रीम कोर्टाला देखील पर्याय राहणार नाही. त्यासोबतच व्हीव्हीपॅट मशीनमधली चिठ्ठी आपल्या हातात आली पाहिजे अशी मागणी करायला हवी. ही मोहिम आपल्याला आगामी प्रजासत्ताक दिनापासूनच तयारी सुरू करुन राबवायला हवी. जर मागणी मान्य झाली नाही तर दबाव नक्कीच निर्माण होईल,'' असं अमोल कोल्हे म्हणालेत.



''वन नेशन वन इलेक्शन वेळी मतदान झालं त्यावेळी मशीनवर अनेकांचं मत नोंदवलं गेलं नाही. त्यावेळी सभापती यांनी आम्हाला कागदावर मत नोंदवण्याची परवानगी दिली. जर संसदेत हे मान्य होतं असेल तर मग स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका का नाही?'' असा सवालही अमोल कोल्हेंनी उपस्थित केला. ''आता मरगळ झटकून टाका कारण पराभव हा आधी मनात होतो मग रणांगणांत पराभव होतो,'' असं अमोल कोल्हेंनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना प्रोत्साहन देताना सांगितलं. सध्या विरोधी पक्षात मोठी जागा शिल्लक आहे त्यामुळे बचेंगे तो और भी लढेंगे, असंही अमोल कोल्हेंनी भाषणाच्या शेवटी म्हटलं आहे.

अमोल कोल्हेंनी केलेल्या टीकेवरुन काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी, अमोल कोल्हेंनी आम्हाला कमी सल्ले द्यावेत असा खोचक टोला लगावला आहे.

# मुंबईकरांनी आणखी किती काळ धुक्याचे वातावरण पाहायचे ?

## वायू प्रदुषणाची समस्या कायम असल्यावरून उच्च न्यायालयाची विचारणा



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केल्याचा दावा राज्य सरकार, महापालिका, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून केला जात असला तरी प्रत्यक्षात परिस्थितीत बदल झालेला नाही. किंबहुना, ही समस्या दिवसेंदिवस चिंताजनक होत आहे. त्यामुळे, मुंबईतील हवा कधी सुधारणार ? मुंबईकरांना धुक्याचे वातावरणच पाहत राहावे लागणार का ? असा खोचक प्रश्न उच्च न्यायालयाने गुरुवारी या यंत्रणांना केला. तसेच, आधी उपाययोजनांचे कागदी घोडे नाचवले जायचे, आता सुनावणीजवळ आल्यावर तोंडदेखल्या कारवाईचे चित्र तयार केले जात असल्याचे ताशेरेही न्यायालयाने संबंधित सर्व यंत्रणांवर ओढले.

बेकऱ्या हेदेखील वायू प्रदूषणासाठी कारणीभूत असलेल्या तीन प्रमुख कारणांपैकी एक असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईत असंख्य बेकऱ्या आहेत. एका अहवालानुसार, मुंबईत प्रतिदिवशी पाच कोटी पावाची निर्मिती केली जाते. त्यासाठी बेकऱ्यांमध्ये कोळसा अथवा खराब लाकडाचा वापर केला जातो. भट्टीत वापरले जाणारे लाकूड हे वायू प्रदूषण वाढवण्यास हातभार लावते. त्यामुळे, ते रोखण्यासाठी बेकऱ्यांमध्ये लाकूड किंवा कोळसा वापरण्यास बंदी घालून त्यांना गॅसचा वापर करण्यास सांगावे, अशी सूचना मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने सरकार, महापालिका आणि एमपीसीबीला केली. तसेच, या सूचनेचा गांभीर्याने विचार करण्याचे आदेश दिले. मुंबईतील रस्त्यावर वाहनांची संख्या दिवसागणिक वाढतच आहे. त्यामुळे, पेट्रोल किंवा डिझेलऐवजी सीएनजी किंवा इलेक्ट्रिक कार वापरण्यास नागरिकांना प्रोत्साहित करण्याचे न्यायालयाने सरकारला सुचविले.

उपाययोजना केल्या जात नाहीत असे आमचे म्हणणे नाही. परंतु, आम्हाला निकाल हवा आहे, विशेष खंडपीठाने यंत्रणांना बजावले. तसेच, मुंबईतील वायू प्रदूषण रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याच्या आवश्यकतेचा पुनरूच्चार केला. मुंबईसह मुंबई महानगर क्षेत्रातील (एमएमआर) हवेची गुणवत्ता आणि दृश्यमानता दिवसेंदिवस खालावत चालली आहे. राज्य सरकार अथवा अन्य कोणत्याही यंत्रणा न्यायालय आदेश देईपर्यंत काहीच उपाययोजना करत नाहीत. न्ययालयाने आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे, दरवेळी न्यायालयाने आदेश दिल्यानंतरच कारवाई करणार का, असा संतप्त प्रश्नही खंडपीठाने केला. वायू प्रदुषणासारख्या गंभीर समस्येला आणि त्यामुळे होणाऱ्या त्रासाला आपण सगळेजण सामोरे जात आहोत. त्यानंतरही कोणीही ठोस उपाययोजना करत नाही. यंत्रणांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव कधी होणार ? अशी विचारणाही न्यायालयाने केली.

महापालिकेची भूमिका आश्चर्यकारक

मुंबईतली हवेची गुणवत्ता खालावण्यास वाढत्या शहरीकरणासह ठिकठिकाणी सुरू असलेले प्रकल्प मोठ्या प्रमाणात जबाबदार असल्याचा आणि महापालिकेलाही ही बाब माहीत असल्याचा दावा या प्रकरणी न्यायालयाच्या सहकार्यासाठी नियुक्त करण्यात आलेले वरिष्ठ वकील दरायस खंबाटा यांनी केला. त्यानंतरही, विकास आणि स्वच्छ हवा यापैकी एकाची निवड करावी लागेल, अशी भूमिका महापालिकेची असल्याकडे त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. न्यायालयाने मात्र महापालिकेची ही भूमिका स्वीकारार्ह नसल्याचे सुनावले. त्यावर, विकासकामे रोखू शकत नाही. परंतु, वायू प्रदूषण रोखण्यासाठी सकारात्मक उपाययोजना करत असल्याचा आणि मुंबईत दिल्लीसारखी स्थिती नसल्याचा दावा महापालिकेच्या वतीने वरिष्ठ वकील मिलिंद साठ्ये यांनी केला. त्यावर, मुंबईची तुलना दिल्लीशी होऊ शकत नाही. मुंबईला भौगोलिक स्थितीचा फायदा होत असल्याचा टोला न्यायालयाने हाणला.

वायू प्रदूषणाबाबत सरकार गंभीर नाही

मुबंई आणि मुंबई महानगरप्रदेशात ७ हजार २६८ उद्योग हे वायू प्रदूषणासाठी कारणीभूत ठरत आहेत. परंतु, त्यापैकी केवळ ९५७ उद्योगांचे पाहणी करण्यात आली आहे. मनुष्यबळाअभावी सगळ्या उद्योगांची पाहणी करता आली नसल्याचे अतिरिक्त सरकारी वकील ज्योती चव्हाण यांनी न्यायालयाला सांगितले. त्यावर, एमपीसीबीतील रिक्त पदे भरण्याचे आदेश देऊनही ती अद्याप भरले न गेल्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. तसेच, सरकार वायू प्रदूषणाबाबत गंभीर नसल्याची टीका केली. त्याचवेळी. ही पदे का भरली गेली नाहीत याचा प्रतिज्ञापत्राद्वारे खुलासा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

### खळबळजनक! विद्यार्थिनीने बुटांच्या लेसचा दोर बनवून शाळेतच घेतला गळफास

**मुंबई/प्रतिनिधी :**देशभरात क्राईमच्या घटनांमध्ये वाढ होत असताना मुंबईतून धक्कादायक घटना घडल्याचे समोर आले आहे. एका विद्यार्थिनीने शाळेतच आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. गोरेगाव येथील नामांकित शाळेत ही घटना घडली असून याप्रकरणी आरे पोलीस ठाण्यात एडीआर दाखल करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोरेगावमधील ओबेराय इंटरनॅशनल शाळेत काल सकाळी दहा वाजेच्या सुमारास ही घटना घडली. एका अकरावीच्या विद्यार्थिनीने शाळेच्या बाथरूम मध्ये जाऊन बुटाच्या लेसच्या साह्याने गळ्याला दोर लावून गळफास घेतला.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच आरे पोलिसांनी शाळेत दाखल होत मुलीची डेड बॉडी पोस्टमार्टम करण्यासाठी रुग्णालयात पाठवले आहेत. सध्या आरे पोलिसांनी अकस्मात मृत्यू (अऊ) ची नोंद करत मुलींनी एवढा मोठा टोकाचा पाऊल का उचलला यामागे काय कारण आहे या संदर्भात अधिक तपास आरे पोलीस करत आहेत.

### जगभरात धास्ती पसरवणाऱ्या 'एचएमपीव्ही'चा पुण्यात दोन दशकांपूर्वीपासून प्रसार

**पुणे/प्रतिनिधी :** चीनमध्ये ह्यूमन मेटान्यूमोव्हायरसचा (एचएमपीव्ही) प्रादुर्भाव वाढला असून, राज्यातही या विषाणूचा शिरकाव झालेला आहे. या विषाणूच्या संसर्गामुळे सध्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रत्यक्षात पुण्यात २००४ मध्येच एचएमपीव्हीच्या रुग्णांची नोंद झाली होती. याबाबतचे संशोधनही त्यावेळी प्रसिद्ध झाले होते. विशेष म्हणजे, गेल्या दोन वर्षात एचएमपीव्हीच्या २० रुग्णांची नोंद बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयात झाली आहे.

नेदरलँडमध्ये एचएमपीव्हीच्या पहिल्या रुग्णाची नोंद २००१ मध्ये झाली. त्यानंतर जुलै २००३ मध्ये ससून सर्वोपचार रुग्णालयात श्वसनविकाराची लक्षणे असलेली काही मुले दाखल झाली.

# महाविकास आघाडीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर; संजय राऊतांनी स्पष्टच सांगितलं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीत समन्वय नसल्याची चर्चा सातत्याने समोर येत आहे. जागा वाटप विलंबाने झाल्याने आणि योग्य जागा वाटप न झाल्याने महाविकास आघाडीचा राज्यात पराभव झाला असं गणित मांडलं जातंय. यावरून आता महाविकास आघाडीतील घटक पक्षातील नेत्यांमध्ये खटके उडायला सुरुवात झाली आहे. शरद पवारांनीही महाविकास आघाडीत समन्वयाच्या अभावामुळे नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे. तर, विजय वडेट्टीवार यांनीही विधानसभेच्या परभवाला जागावाटपाला कारणीभूत ठरवलं आहे. आता संजय राऊतांनीही या विषयी वक्तव्य केलंय. महाविकास आघाडीत समन्वय नसल्याचंही त्यांनी मान्य केलं.

जागा वाटप विलंबाने झाले, त्यामुळे अस्वस्थता पसरली. कार्यकर्त्यांना काम करायला वेळ मिळला नाही, अशी खंत संजय राऊतांनी व्यक्त केली. ते म्हणाले, ''विजय वडेट्टीवार यांची वेदना ही संपूर्ण महाविकास आघाडीची वेदना आहे. चुका झाल्या आहेत आणि त्या स्वीकारल्या पाहिजेत. अनेक ठिकाणी चुकीच्या पद्धतीने जागावाटप झालं. तेव्हाही आम्ही सांगत होतो. पण आता त्यावर चर्चा करण्यात अर्थ नाही. नाना पटोले आणि माझ्यात वाद सुरू होता. पण वाद त्या पद्धतीचा नव्हता. जागा वाटपाला विलंब झाला, हाच मुद्दा आहे.''

''या जागा वाटपात वडेट्टीवार होतेच. त्यांनी विदर्भातील जागा शिवसेना किंवा राष्ट्रवादीला सोडल्या असत्या तर बरं झालं असतं. कारण त्या जागा ते हरले आहेत. चंद्रपूरची जागा किशोर जोरगेवार राष्ट्रवादीतून लढणार होते. यासाठी १७ दिवस राष्ट्रवादीने प्रयत्न केले. पण काँग्रेसने ही जागा सोडली नाही. अखेर किशोर जोरगेवार भाजपात गेले आणि जिंकले. काही लोकांना वाटत होतं की आम्हीच जिंकू. आम्हाल जागा मिळायला पाहिजे. देशातील वातावरण बदललं आहे, वगैरे'', असं म्हणत संजय राऊतांनी अप्रत्यक्षपणे काँग्रेसवर टीका केली.



''लोकसभा निवडणुकीतील विजय वेगळा आहे, त्यामुळे सत्ताधारी पक्ष सावध झाला आहे. (विधानसभेच्या पराभवाला) याला सगळेच जबाबदार आहेत. कोल्हापूर उत्तरची जागा आम्ही आग्रहाने मागत होतो. आम्ही ६ वेळा जिंकलो आहोत, ही जागा आमच्याकडे आली असती तर आम्ही जिंकलो असतो. अशा अनेक जागा आहेत. प्रत्येकाला आपआपल्या जागा हव्या होत्या, पण त्या चर्चा सकारात्मक होऊ शकल्या नाहीत. काँग्रेसच्या केंद्रीय समितीने म्हणावा तसा हस्तक्षेप केला नाही. महाराष्ट्रासारखं राज्य महाविकास आघाडीच्या हातून जाणं ही या राज्यासाठी दुर्घटना आहे'', असंही संजय राऊत म्हणाले.

काँग्रेसने पुढाकार घेतला पाहिजे

''हे खरं आहे की इंडिया आघाडीच्या बाबातीत तेजस्वी यादव, ममता बॅनर्जी, केजरीवाल यांनी भूमिका मांडली. लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची बैठकच झाली नाही. महाराष्ट्रातील विधानसभा निकालानंतर तीन पक्षात अजिबात समन्वय राहिला नाही, हे सत्य आहे. समन्वय नसेल तर त्याची किंमत भविष्यात सर्वांना मोजावी लागेल. काँग्रेस पक्ष देशातील सर्वात मोठा पक्ष आहे. त्याने पुढाकार घेऊन एकत्र येण्याकरता पुढाकार घेतला पाहिजे. आमच्यात राष्ट्रीय पक्ष काँग्रेस आहे. त्यामुळे ही त्यांची जबाबदारी आहे'', असंही संजय राऊत म्हणाले.

# राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त विशेष वैद्यकीय सेवा मदत कक्ष आणि आरोग्य शिबिराचे आयोजन

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची संकल्पना

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सिंदखेडराजा नगरीत येणाऱ्या जिजाऊ भक्तांच्या आरोग्य सुविधेसाठी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून विशेष वैद्यकीय सेवा मदत कक्ष आणि आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिराचे आयोजन जिजाऊ विद्यालयामध्ये करण्यात आले आहे.

या शिबिराचे १२ जानेवारीला सकाळी ९ वाजता केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला कामगारमंत्री आकाश फुंडकर, आमदार मनोज कायदे, माजी आमदार शशिकांत खेडेकर, जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ भागवत भुसारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गिते, प्रा. बळीराम मापारी, ऋषीभाऊ जाधव, मायाताई म्हस्के, शेख सिद्धीकी, बाबुराव मोरे, माजी नगराध्यक्ष सतीश तायडे, वैभव देशमुख, बालाजी मेहेत्रे हे उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थळ असलेल्या सिंदखेडराजा येथील राजे लखुजी जाधव यांच्या राजवाडा येथे जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त माँ जिजाऊ चरणी नतमस्तक होण्यासाठी राज्यभरातून हजारो भक्त १२ जानेवारीला सिंदखेडराजा नगरीमध्ये येत असतात. आरोग्यसेवा हीच ईश्र्वरसेवा समजुन भक्तगणांच्या आरोग्य सुविधेसाठी या विशेष वैद्यकीय सेवा मदत कक्ष आणि आरोग्य शिबिराचा आयोजन करण्यात आले आहे.



याशिबिरात अस्थिरोग तज्ञ, कान नाक घसा, मूत्रपिंड व मूत्रमार्ग विकार तज्ञ, कर्करोग तज्ञ, बालरोग तज्ञ, पोटविकार तज्ञ, मानसिक आजार तज्ञ, हृदयरोग तज्ञ, मेदु तपासणी आणि नेत्र तपासणी सोबतच मोफत चष्मे आणि औषधीचे वाटप करण्यात येणार आहे. या शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. या आरोग्य शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ‘इंडिया’ आघाडी मजबूत राहील, सचिन पायलट यांना विश्वास; चव्हाणांच्या वक्तव्यावर थेट बोलणं टाळलं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ''देशातील संवैधानिक संस्थांना असलेला धोका लक्षात घेऊन त्या संस्था वाचवण्यासाठी देशपातळीवर विविध पक्षांनी एकत्रित येऊन 'इंडिया' आघाडी तयार कली आहे. संविधान व संविधानिक संस्थांसमोरील धोका अद्याप कायम आहे, त्याचप्रमाणं 'इंडिया' आघाडी देशपातळीवर पूर्ण ताकदीनं कार्यरत आहे. राज्य पातळीवर काही ठिकाणी वेगळी परिस्थिती असली, तरी देश पातळीवर 'इंडिया' आघाडी मजबूत आहे. ही आघाडी मजबूत राहील,'' असा विश्वास माजी केंद्रीय मंत्री, काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस सचिन पायलट यांनी व्यक्त केला.



पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्यानं काँग्रेसमध्ये नाराजी : ''काँग्रेस आणि आप यांनी निवडणूक करार केला असता, तर चांगलं झालं असतं. दिल्ली विधानसभा निवडणूक महत्त्वाची आहे. दोन्ही पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. मला वाटतं अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील 'आप' पक्ष मजबूत स्थितीत आहे. दिल्ली विधानसभा निवडणूक 'आप' जिंकेल,'' असं वक्तव्य माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केलं. त्यामुळे काँग्रेसमध्ये नाराजी पसरली. पक्षातून या वक्तव्याला विरोध झाल्यानंतर चव्हाणांनी सारवासारव करत आपल्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आल्याचा खुलासा केला.

पृथ्वीराज चव्हाणांच्या वक्तव्यावर थेट उत्तर टाळलं : सचिन पायलट यांना पृथ्वीराज चव्हाण यांच्या विधानाबाबत विचारल्यावर त्यांनी त्यावर थेट उत्तर देणं टाळलं. पृथ्वीराज चव्हाणांनी त्याबाबत केलेल्या खुलाशाकडं त्यांनी लक्ष वेधलं. ''दिल्ली निवडणुकीसाठी 'इंडिया' आघाडीतील घटक पक्ष आप सोबत असल्याच्या मुद्द्यावर त्यांनी जास्त बोलणं टाळलं. दिल्ली विधानसभा निवडणुकीत समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेसनं आपला पाठिंबा दिला आहे. देशपातळीवर इंडिया आघाडी कमजोर झालेली नाही. 'इंडिया' आघाडीची साथ कुणी सोडलेली नाही,'' असा दावा त्यांनी केला. ''दिल्लीत आम्ही स्वबळावर लढतोय, त्यामध्ये आम्हाला चांगलं यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. २०२५ या वर्षात काँग्रेस पक्ष संघटना अधिक सशक्त करण्यात येईल, १५ जानेवारीला काँग्रेसच्या नव्या मुख्यालयाचं उद्घाटन होईल,'' असं सचिन पायलट म्हणाले.

भाजपाला देशपातळीवर आव्हान : देशात अनेक पक्ष आहेत, त्यापैकी काही काँग्रेसचे समर्थक आहेत, तर काही काँग्रेसचे विरोधक आहेत. मात्र, भाजपाला राष्ट्रीय स्तरावर आव्हान देण्याची क्षमता काँग्रेसम ध्येच आहे, असा दावा त्यांनी केला. काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य नसीम खान, आमदार अमीन पटेल, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे या पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

भाजपाच्या कथनी आणि करणीत फरक : भाजपाच्या कथनी आणि करणीत फरक आहे. सरकारच्या योजनांमुळे देशातील गरीब आणि श्रीमंतांमध्ये मोठी दरी निर्माण होत आहे. सरकार केवळ धम च्या नावावर भेद करुन नागरिकांचं लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. सरकारनं आतापर्यत ज्या घोषणा केल्या, त्यांची सद्यस्थिती काय आहे, हे समोर येण्याची गरज आहे, असे पायलट म्हणाले. देशातील सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक सुरक्षितता देण्यात सरकार अपयशी ठरले आहे, असा आरोप त्यांनी केला.

# जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती; अशासकिय सदस्य नियुक्तीसाठी अर्ज आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटीच्या अशासकिय सदस्यांचा कार्यकाळ संपलेला असल्याने नविन समितीची पुर्नगठीत करण्यासाठी अशासकिय सदस्य नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने पात्र इच्छुकांनी दि. १६ जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ.अमितकुमार दुबे यांनी केले आहे.



अशासकीय सदस्यांची निवड जिल्हाधिकारी यांचे मार्फत करण्यात येणार असून सोसायटीमध्ये खालीलप्रमाणे अशासकिय सदस्य असणार आहेत. संबंधित जिल्ह्यातील गोशाळा किंवा पांजरपोळ संस्थांपैकी एका संस्थेचा अध्यक्ष, प्राणी कल्याण विषयक कार्य करीत असलेल्या सेवाभावी संस्थेचे दोन सदस्य, सर्वसाधारण समितीने नामनिर्दे शीत केलेल्या दोन व्यक्ती, संबंधित जिल्ह्यातील मानव हितकारक कार्य करणारे किंवा प्राण्यांवर प्रेम करणारे प्राणी कल्याणसाठी काम करणारे पाच ते सहा कार्यकर्ते यांची जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीसाठी अशासकिय सदस्यांची निवड करावयाची आहे.

नविन सदस्यांच्या निवडीसाठी जिल्यातील इच्छुकांनी आपला अर्ज वैयक्तीक माहीती व बायोडाटा आधार क्रमांक(आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसंस, आयडी कार्ड, पॅन कार्ड यापैकी एक), रहिवाशी प्रमाणपत्र (ईलेक्ट्रीक बिल, आधार कार्ड, टेलिफोन बिल, पासपोर्ट यापैकी एक) जिल्हा पोलिस अधिक्षक यांचे चारीत्र पडताळणी प्रमाणपत्र व आवश्यक कागद पत्रासह जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त बुलडाणा यांच्याकडे सादर करण्यात यावे.

# ‘गेम चेंजर’ पहिल्या दिवशी किती कमाई करेल, जाणून घ्या...

**मुंबई/प्रतिनिधी :** 'गेम चेंजर' चित्रपट रुपेरी पडद्यावर १० जानेवारी रोजी प्रदर्शित झाला आहे. आता या चित्रपटाला पाहण्यासाठी अनेक प्रेक्षक चित्रपटगृहांमध्ये जात आहेत. राम चरण स्टारर 'गेम चेंजर' राजकीय ॲक्शन ड्रामा असून या चित्रपटाला आता प्रेक्षकांचा संमिश्र प्रतिसाद मिळत आहे. राम चरणचा दिग्दर्शक एस. शंकरबरोबरचा पहिल्याच चित्रपट आहे. एस. शंकर यांचा शेवटचा चित्रपट 'इंडियन २' बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला होता. एस. शंकर यांनी 'गेम चेंजर' चित्रपटाद्वारे तेलुगू चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं आहे.

'गेम चेंजर'ची किती विकली गेली तिकिट : सॅकनिल्कच्या मते, राम चरण आणि कियारा अडवाणी स्टारर 'गेम चेंजर' बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करू शकतो. हा चित्रपट रिलीजच्या पहिल्या दिवशी सुमारे ४३.५५ कोटी रुपयांची कमाई करेल. या चित्रपटाच्या तेलुगू २डी आवृत्तीनं ७२६१३० तिकिटे विकली, तर तमिळ २डी आवृत्तीनं ४८८८४ तिकिटे विकली. हिंदी २डी १,४३,१४६ तिकिटे विकली गेली आहे. आता या चित्रपटाची एकूण कमाई २६-३० कोटी रुपयांच्या दरम्यान आहे. अहवालांनुसार, 'गेम चेंजर'नं शुक्रवारी सकाळी १० वाजेपर्यंत भारतात सर्व भाषांमध्ये १२.७५ कोटी रुपये कमावले आहेत.

'गेम चेंजर'ची किती होईल कमाई : दुसरीकडे, चित्रपट उद्योगाचे ट्रॅकर मनोबाला विजयबालन यांनी दावा केला आहे की, राम चरणचा 'गेम चेंजर' जगभरात ६५ कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई करेल. त्यांनी इंस्टाग्रामवर लिहिलं, 'गेम चेंजर'ची आगाऊ कमाई जगभरातील बॉक्स ऑफिसवर ६५ कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे.' दुसरीकडे 'व्यापार विषक रमेश बाला यांच्या मते, 'गेम चेंजर'ला बॉक्स ऑफिसवर चांगली सुरुवात मिळेल.

# ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापर मर्यादा शिथिलतेचे दिवस निश्चित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** ध्वनी प्रदुषण नियमन व नियंत्रण नियम २००० अन्वये ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांच्या वापरासाठी श्रोतृगृहे, सामुहिक सभागृहे व मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी जिल्ह्याच्या निकडीनुसार वर्षामध्ये १५ दिवस निश्र्चित करून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट देण्यात येणारे दिवस जाहीर करण्यात आले आहे. ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर ध्वनीची विहीत मर्यादा राखून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत पुढील वर्षात सुट देण्यात येणारे १३ दिवस जाहीर करण्यात आले आहे. तर उर्वरित २ दिवस राखीव ठेवण्यात येवून महत्वाच्या वेळी व गरज भासल्यास त्या त्या वेळी निश्र्चित करण्यात येणार आहे. ध्वनी मर्यादेचे व तरतूदींचे उल्लंघन होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी. उच्च न्यायालयाने वेळोवेळी ध्वनी प्रदुषणासंबंधात दिलेल्या आदेशात नमूद बाबींचे तंतोतंत पालन करावे. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी कळविले आहे.

### निश्चित केलेले दिवस

राजमाताजिजाऊ जयंती, शिवजयंती, ईद ए मिलाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, छत्रपती संभाजी महाराज जयंती, गणपती उत्सवातील दुसरा, पाचवा, गौरी विसर्जन व अनंत चर्तुदशी असे चार दिवस, नवरात्री उत्सवाचे अष्टमी व नवमीचा दिवस, लक्ष्मीपूजन व ३१ डिसेंबर २०२५.

# खरीप व रब्बी हंगामासाठी शेतमालाला हमीभाव निश्चित; शेतमाल तारण योजनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासनाने सन २०२४-२५ मधील खरीप व रब्बी हंगामासाठी शेतमालाला हमीभाव निश्र्चित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी आपला उत्पादीत केलेला माल नजीकच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्री करावा. तसेच शेतकऱ्यांसाठी शेतमाल तारण योजना सुरु केली असून पिकांना योग्य भाव मिळेपर्यंत उत्पादीत माल गोदामात ठेवण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळणास मदत होणार असून या योजनाचा लाभ शेतकरी बांधवानी घ्यावा, असे आवाहन सहकारी संस्थाचे जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

गहू २ हजार २७५ रुपये, ज्वारी(हायब्रीड-मालदांडी) ३ हजार ३७१-३ हजार ४२१ रुपये , सोयाबीन ४ हजार ८९२ रुपये, मका २ हजार २७५ रुपये, तुर ७ हजार ५५० रुपये, मुग ८ हजार ६८२ रुपये, उडीद ७ हजार ४०० रुपये, चना ५ हजार ४४० रुपये शासनाने हमीभाव निश्र्चित केला आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला शासनाने घोषित केलेल्या हमीभाव व बाजारभावाप्रमाणे नजीकच्या कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्री करावा. कृषि उत्पन्न बाजार समितीबाहेर खाजगी व्यापाऱ्यांना विक्री केल्यास फसवणुक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेला शेतमाल काढणी हंगामात त्यांच्या आर्थीक निकडीमुळे त्वरीत विक्रीसाठी बाजार आणतात. त्यामुळे विक्रीसाठी एकाचवेळी बाजारपेठेत शेतमालाची मोठ्या प्रमाणात आवक होते व परिणामी बाजारभाव कमी होवुन शेतकऱ्यांचे आर्थीक नुकसान होते. शेतकऱ्यांनी चांगल्या प्रतीचा शेतमालाची काही काळासाठी साठवणूक करुन बाजारभाव चांगले असतांना साठवणुकीतील शेतमाल टप्याटप्याने विक्री केल्यास त्यांना फायदा होऊ शकतो. शेतकऱ्यांना असणारी आर्थीक निकड पूर्ण होऊन त्यांच्या शेतीमालासाठी रास्त भाव मिळावा या दृष्टिकोनातुन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे यांचे मार्फत शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या अथवा वखार महामंडळाच्या गोदामामध्ये ठेवलेल्या



शेतमालाच्या पावतीवर शेतमालाच्या बाजारभावानुसार रकमेच्या ७५ टक्के पर्यंत रक्कम शेतकऱ्यांना १८० दिवसांच्या मुदतीकरीता द.सा.द.शे.६ टक्के व्याजाने तारण कर्ज बाजार समितीकडुन त्वरीत देण्यात येते. शेतमाल तारण कर्ज योजनेत तुर, मुग, उडीद, सोयाबीन, मका, ज्वारी, गहु, हळद, भात (धान), करडई, बाजरी, राजमा, बेदाणा, काजु बी व सुपारी या पिकांचा समावेश आहे. सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा.

## विविध वृत्त...

### मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता स्वामी विवेकानंद जयंती निमित्त राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात येत आहे. या दिनाचे औचित्य साधून संस्थेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात गुणवत्ता प्राप्त प्रशिक्षणार्थ्यांचा सत्कार करण्यात येईल. तसेच आत्मनिर्भर भारत, स्वामी विवेकानंद यांचे उद्योजकता, देशाच्या विकासात कौशल्याचे महत्व, एआय शाप की वरदान अशा विविध विषयांवर वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्वामी विवेकानंद यांचा तरूणांच्या उत्तम शरीरयष्टीकडेही विशेष कल होता. त्यामुळे पारंपारिक क्रीडा स्पर्धा सुद्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेतील उत्कृष्ट स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष, आमदार, समाजसेवक उद्योजक व व्याख्यानकार यांना आमंत्रित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आजच्या तरूणांना पुढील भविष्याकरीता रोजगार व स्वयंरोजगार यांवर मार्गदर्शन सुद्धा केल्या जाणार आहे. त्यामुळे कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी व आपल्या मुलांच्या पुढील उज्वल भवितव्यासाठी नागरीकांनी आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस. ही गंगावणे यांनी केले आहे.

### मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे कार्यशाळा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे दि. ९ जानेवारी रोजी विशेष गतीमानता पंधरवडामार्फत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनाबाबत कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी तज्ज्ञाव्दारे प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले

जिल्ह्यातील युवक-युवतीच्या सर्जनशीलतेला वाव मिळून स्वयंरोजगारास पूरक वातावरण मिळावे तसेच ग्रामीण व शहरी क्षेत्रात सुक्ष्म, लघु उपक्रमांव्दारे व्यापक रोजगाराच्या संधी व शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीसंदर्भातील माहिती प्रशिक्षनार्थ्यांना होण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्योग अधिकारी एन एस. पाटील व मिटकॉनचे जिल्हा समन्वयक कैलास स्वराटे यांनी शासनाच्या विविध योजना व उद्योग उभारण्याबाबतची माहिती देऊन मार्गदर्शन केले. शासकीय नोकरी मिळणे सोप नसून उद्योग उभारणी करुन रोजगार निर्मिती करण्याचे आवाहन उभयतांनी केले.

### प्रधानमंत्री आवास योजना; लाभार्थ्यांनी कागदपत्र सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री आवास योजनेतील ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत वाढीव १३ लक्ष ६६ हजार ७६७ घरकुले मंजूर होणार आहे. त्यानुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायतच्या ड यादीनुसार घरकुलाची लक्षांक प्राप्त होणार आहे. प्राप्त लक्षांकानुसार आवास लस ड प्रतीक्षा यादीतील लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे आपल्या ग्रामपंचायतीत सादर करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात व प्रकल्प संचालक राजेश इंगळे यांनी केले आहे.

ग्रामपंचायत स्तरावर लाभर्थ्याकडून बँक पासबुक प्रत, आधार कार्ड, नमुना नंबर आठ, जॉब कार्ड, इ कागदपत्रे ग्रामपंचायत अधिकारी, रोजगार सेवाक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्यामार्फत जमा करणे सुरु आहे. अद्यापर्यंत जिल्ह्यामध्ये आवास सॉफ्ट वरील कायस्वरुपी प्रतिक्षायादीतील शिल्लक १ लक्ष १८ हजार ७२३ लाभार्थ्यांपैकी प्राप्त होणाऱ्या लक्षांक ४१ हजार ३१५ (अंदाजे) पैकी २५ हजार ९९० म्हणजे ६२.९१ टक्के लाभार्थ्यांचे आवास सॉफ्टवर नोंदणीची प्रक्रीया पुर्ण झाली आहे. अजूनही उर्वरीत १७ हजार ३०८ लाभार्थ्यांनी नोंदणी करणे बाकी आहे. या लाभार्थ्यांनी नमूद कागदपत्रे आपल्या ग्रामपंचायतींना सादर करणे आवश्यक आहे. कागदपत्रे जमा करुन केवळ लाभार्थ्यांची नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करायची आहे. शासनामार्फत जिल्हा लक्षांक प्राप्त झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर करण्यात येणार आहे.

### अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य धर्मपाल मेश्राम हे दि.१२ व १३ जानेवारी २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे.

रविवार दि. १२ जानेवारी रोजी अहिल्यानगर येथून कारने रात्री ८ वाजता शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे आगमन व मुक्काम. सोमवार दि.१३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता संत ज्ञानेश्र्वर मागासवर्गीय मुलांचे वसतीगृहास भेट. सकाळी १२ ते २ वाजेपर्यंत नगरपालिका समिती सभागृह, बुलढाणा येथे मुख्याधिकारी, नगरपालिका बुलढाणा यांच्यासोबत अनु.जाती जमातीतील कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत, अनुकंपा तत्वावरील नोकरीबाबत व लाडपागे प्रलंबित प्रकरणाबाबत आढावा व चर्चा. दुपारी २ ते ३ वाजेपर्यंत राखीव. दुपारी ३.३० वाजता शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथून कारने अमरावतीमार्गे नागपूरकडे रवाना.